# जाहिरात

## सातारा जिल्हा परिषद सातारा

## शिक्षण विभाग (प्राथमिक)

## शालेय पोषण आहार योजना

**क्र साजिप/शिक्षण/शापोआ/प्रशा २३/ /२०१८ दि. २०/१२/२०१८**

शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत जिल्हा परिषद अंतर्गत रिक्त असणारी डेटा एन्ट्री ऑपरेटरची पदे तात्पुरत्या स्वरुपात पुढील ११ महिन्याचे कालावधी करिता कंत्राटी पध्दतीने एकत्रित मानधनावर भरण्यात येणार आहेत. जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या शैक्षणिक व व्यावसायिक अटी पूर्ण करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज सोबत दिलेल्या विहीत नमुन्यात शिक्षण विभाग प्राथमिक, जिल्हा परिषद सातारा येथे दि. २०/१२/२०१८ ते दि. २९/१२/२०१८ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत समक्ष अथवा पोस्टाने सुटटीचे दिवस वगळून स्वीकारले जातील.

| अ क्र | पदाचे नाव | पदांची संख्या | मासिक एकत्रित परिश्रमिक | शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता |
|---|---|---|---|---|
| १ | डेटा एन्ट्री ऑपरेटर | जिल्हास्तर १<br>तालुकास्तर ३ | रु १०९३२/- | १.किमान १२ वी पास<br>२. मराठी टंकलेखन ३० श प्र मि<br>३. इंग्रजी टंकलेखन ४० श प्र मि<br>४. एम एस सी आय टी किंवा तत्सम परीक्षा |

**१. वयोमर्यादा – दि. ०१.०१.२०१८ अखेर उमेदवाराचे वय किमान १८ वर्षे पूर्ण व सर्वसाधारणसाठी कमाल ३८ वर्ष (मागासवर्गीय उमेदवारांसाठी ५ वर्ष शिथिल) या दरम्यान असावे.**

**२. निवड पध्दती –**

२.१ शैक्षणिक व व्यावसायिक अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्या उमेदवारास १० वी व १२ वी मध्ये मिळालेल्या गुणांची टक्केवारी यांची एकत्रित बेरीज करुन त्यामध्ये उमेदवार पदवीधर असल्यास त्यास १० गुण बोनस देऊन उमेदवारांची मंजूर पदांच्या पाचपट गुणानुक्रमे यादी तयार करणेत येईल.

२.२ सदर यादीमधील उमेदवारांची संगणक (५० गुण) व टंकलेखन प्रात्यक्षिक परीक्षा(मराठी टंकलेखन २५ गुण, इंग्रजी टंकलेखन २५ गुण) अशी एकूण १०० गुणांची परीक्षा एकाच दिवशी घेण्यात येईल.

२.३ उपरोक्त नं २.१ व २.२ मधील गुण एकत्रित करुन गुणानुक्रमे मंजूर पदाएवढी निवड यादी प्रसिध्द केली जाईल आणि त्यानुसार सदर उमेदवारांना कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात डेटा एन्ट्री ऑपरेटर म्हणून नियुक्ती देण्यात येईल व तेवढयाच पुढील उमेदवारांची प्रतिक्षा यादी प्रसिध्द केली जाईल.

**३. सूचना –**

३.१ उमेदवारांनी विहीत नमुन्यात अलीकडच्या काळातील साक्षांकित पासपोर्ट साईज फोटोसह अर्ज सादर करावा. सदर अर्जाच्या पाकिटांवर **डेटा एन्ट्री ऑपरेटर पदाकरिता अर्ज** असे नमूद करावे.

३.२ अर्जासोबत शैक्षणिक पात्रता, व्यावसायिक पात्रता, वय, अनुभव इत्यादी संदर्भातील कागदपत्रांच्या छायांकित साक्षांकित प्रती जोडाव्यात.

३.३ अर्ज करण्याची अंतिम तारीख - २९.१२.२०१८.

त्यानंतर आलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्वीकारले जाणार नाहीत.

**३.४ पात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द झालेनंतर त्या उमेदवारांनी www.zpsatara.gov.in या संकेतस्थळावरुन परीक्षेचे प्रवेश पत्र डाऊनलोड करुन त्यावर उमेदवाराचा अलीकडील पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवून व साक्षांकित करुन प्रवेश पत्रावर नमुद असलेल्या परिक्षेच्या ठिकाणी नमुद वेळेच्या अगोदर उपस्थित रहावे. सविस्तर सुचना प्रवेश पत्रावर देण्यात येतील.**

३.५ परीक्षेतील उत्तीर्ण उमेदवारांना नियुक्तीपूर्वी उमेदवाराकडून शासनाकडील विहीत नमुन्यात करारनामा करुन घेण्यात येईल आणि त्यासोबत उमेदवारावर कोणत्याही प्रकारचा गुन्हा व आरोप नसल्याचे प्रतिज्ञापत्र स्वतंत्रपणे सादर करावे लागेल. कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या डेटा एंट्री ऑपरेटर या पदासंबंधी सेवा शर्ती, शैक्षणिक अर्हता, एकत्रित ठोक मानधन व नियुक्तीची कार्यपध्दती यासंबंधी आवश्यक ते बदल तसेच निर्णय घेण्याचे अधिकार शासनास राहतील.

३.६ डेटा एंट्री ऑपरेटर म्हणून नियुक्त केलेल्या कंत्राटी पध्दतीच्या कर्मचाऱ्यास नियमित सेवेचे कोणतेही लाभ मिळणार नाहीत.

३.७ सदर पदांची भरती कंत्राटी पध्दतीने करावयाची असल्याने बिंदू नामावली प्रमाणे पदे भरण्याची आवश्यकता नाही.

**सही/-**
**सदस्य सचिव,**
**जिल्हा निवड प्रक्रिया समिती**
**तथा शिक्षणाधिकारी (प्राथ)**
**जिल्हा परिषद सातारा**

**सही/-**
**अध्यक्ष,**
**जिल्हा निवड प्रक्रिया समिती**
**तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद सातारा**

# जिल्हा परिषद सातारा, शिक्षण विभाग प्राथमिक
## शालेय पोषण आहार योजना – डेटा एंट्री ऑपरेटर पदाकरिता अर्ज – २०१८
## अर्जाचा कार्यालयीन नोंदणी क्र दिनांक

प्रति,
सदस्य सचिव,
जिल्हा निवड प्रक्रिया समिती,
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद सातारा

उमेदवाराचा
अलीकडच्या काळातील
राजपत्रीत अधिकारी
यांनी साक्षांकित
केलेला पासपोर्ट
साईज फोटो

**विषय - शालेय पोषण आहार योजना सन २०१८-१९**
**डेटा एंट्री ऑपरेटर पदाकरिता अर्ज**

१. उमेदवाराचे अर्ज -

२.पत्रव्यवहाराचा पत्ता -

मोबाईल नंबर -
३. जन्मतारीख (शालांत प्रमाणपत्रानुसार)

४. वय दिनांक १/१२/२०१८ रोजी वर्ष महिना दिवस
५. अर्जदाराची शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता

| अ क्र | परीक्षेचे नाव | परीक्षा मंडळ / विदयापीठाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | गुणांची टक्केवारी | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

अनुभव -

| अ क्र | संस्थेचे नाव व पत्ता | धारण केलेले पद | सेवा कालावधी(पासून – पर्यंत) | एकूण सेवा |
|---|---|---|---|---|
| | | | | |

अर्जासोबत सादर केलेल्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित छायांकित प्रती –

**प्रतिज्ञापत्र**

प्रमाणित करतो / करते की, सदर अर्जात सादर केलेली माहिती खरी आहे. सदर माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास माझी निवड रद्द करण्यात यावी. त्यास माझी कोणतीही हरकत राहणार नाही.

दिनांक –
स्थळ –

(उमेदवाराची स्वाक्षरी)